श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपळगांव टप्पा, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांना आरोग्य सहाय्यक (पुरुष) या पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- आरोग्य/आस्था-३/५८५/२०२६
अहिल्यानगर, दिनांक- २६/०४/२०२६

वाचा :- १. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपळगांव टप्पा, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांच्या कडील पत्र क्र. प्रा.आ.कें./४२/२०२, दि. १०/०३/२०२६
२. सहा.पोलीस निरिक्षक, राजूर पोलीस स्टेशन यांचेकडील पत्र क्र. ३४८/२०२६, दिनांक- ०९/०३/२०२६
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (२)

१. ज्या अर्थी श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपळगांव टप्पा, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर हे प्राथमिक आरोग्य केंद्र-मवेशी, ता.अकोले येथे कार्यरत असताना, शासनाच्या रकमेची फसवणूक करुन अपहार केल्या प्रकरणी दिनांक- ३१/१२/२०२५ ते दिनांक- १६/०१/२०२६ पर्यंत पोलीस स्टेशन राजूर येथे अटक करण्यात आली असले बाबत संदर्भ क्र.१ व २ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविणेत आले आहे. आपण जिल्हा परिषद कर्मचारी असुन सदैव निरपराद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि, आपण कर्तव्याचे पालन न केल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

२. ज्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधिन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना अभिरक्षेत स्थानबध्दतेचा दिनांक- ३१/१२/२०२५ पासून जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करीत आहे.

३.आणखी, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढयाकालावधीत श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांचे मुख्यालय तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय / प्रा.आ.केंद्र चापडगांव, तालुका / पंचायत समिती शेवगांव ---------- येथे राहिल. आणि श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय / प्रा.आ.केंद्र चापडगांव, तालुका / पंचायत समिती शेवगांव ---------- यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

४.श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

५. निलंबनाचे कालावधीत, श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल. त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही. अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांनी तालुका आरोग्य

अधिकारी कार्यालय / प्रा.आ.केंद्र पिंपळगाव टप्पा, तालुका / पंचायत समिती पाथर्डी यांना सादर करावे.

६.निलंबनाचे कालावधीत श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही तालुका आरोग्य अधिकारी, / वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र पिंपळगाव टप्पा, तालुका / पंचायत/समिती पाथर्डी हे करतील.

७.या आदेशाची नोंद श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

८.सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०४२६१०००५१ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-04-2026 14:46:11
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.बाबासाहेब रामराव लोंढे, आरोग्य सहाय्यक (पुरुष),
द्वारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपळगांव टप्पा, ता.पाथर्डी जि.अ.नगर
प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपळगांव टप्पा, ता.पाथर्डी जि.अ.नगर
२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.
प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- चापडगाव, ता. शेवगाव,
जि.अ.नगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी / शेवगाव
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- आरोग्य विभाग, अस्थापना-३, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर